स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./मा.तं./ /25-26**
**दिनांक : / /2025**

# वैद्यकीय आरोग्य विभाग
# प्रेस नोट

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अवैध वैद्यकीय व्यवसायिक (Bogus Doctor) प्रॅक्टीस करीत असलेबाबत तोंडी माहिती प्राप्त झाल्याने तसेच अशा अवैध वैद्यकीय व्यवसायीकांपासून नागरीकांच्या जीवितास हानी पोहचण्याची शक्यता असल्याने अशा अवैध वैद्यकीय व्यवसायिकांना शोधून त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे गरजेचे होते.

याअनुषंगाने दिनांक 25/07/2025 रोजी चिंचोटी नाका, कामण परिसरात वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. राजेश चौहान, आर.सी.एच. अधिकारी डॉ. स्मिता वाघमारे, पीसीपीएनडीटी अधिकारी डॉ. पूजा गुप्ता, वैद्यकीय अधिकारी श्रीनिवास दूधमल, वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी नाईकनवरे आणि वैद्यकीय आरोग्य विभागातील कर्मचारी यांच्या दोन टीम तयार करुन धडक मोहिम राबविण्यात आली.

या धडक मोहिमेत चिंचोटी-कामण भागातील काही दवाखान्यांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये बी.ए.एम.एस. आणि बी.एच.एम.एस. डॉक्टरांच्या दवाखान्यांची तपासणी केली असता जे दवाखाने महानगरपालिकेकडे नोंदणीकृत नाहीत अशा दवाखान्यांत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन हे प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले. त्यामुळे अशा दवाखान्यांतील जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट कशाप्रकारे करण्यात येते याबाबत प्रश्न निर्माण होत आहे. अशा डॉक्टरांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन हे प्रमाणपत्र घेणेबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. जर असे दवाखाने, पॅथॉलॉजी लॅब, डायग्नोस्टिक सेंटर इ. महानगरपालिका कार्यक्षेत्रात आढळल्यास जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, 2016 नुसार कारवाई करण्यात येईल.

सदर धडक मोहिमे अंतर्गत दोन इसमांवर नायगाव पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल करण्यात आली. अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या इसमांची माहिती पुढील प्रमाणेः-
1) श्री. सुनिल कुमार यादव, परमहंस क्लिनिक, इडी इस्टेट समोर, सागपाडा, चिंचोटी, पो. कामण, ता. वसई, जि.पालघर.
2) श्री. लिटन मृत्तुजोय बिस्वास, शॉप नं.02, चिंचोटी, भजनलाल डेअरी हॉटेल, पो. काम, ता. वसई, जि.पालघर.

अशा अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी सदरचे धाडसत्र असेच सुरु राहणार असून वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र 'बोगस डॉक्टर मुक्त' करण्याचे आवाहन स्वीकारुन महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यरत राहणार असून नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांपासून सावध रहा. तसेच असे इसम आपल्या कार्यक्षेत्रात असल्यास याबाबत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, वैद्यकीय आरोग्य विभाग, सातवा मजला, म्हाडा कॉलनी रोड, विरार (प.) येथे माहिती देण्यात यावी. आपण दिलेल्या माहितीबाबत गोपनीयता ठेवण्यात येईल.